क्रमांक : ४२८७ /ब कक्ष
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधानभवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ८ मार्च, २०२१

# :: परिपत्रक ::

**विषय :-** महाराष्ट्र विधानसभेच्या सन २०२१ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनासाठी विभागाकडे पाठविण्यात आलेल्या प्रश्नावरील कार्यवाहीबाबत.

**संदर्भ :-** या सचिवालयाचे परिपत्रक क्र.१४०७/ब कक्ष, दिनांक २७ जानेवारी, २०२१

सर्व मंत्रालयीन विभागांना कळविण्यात येते की, विधानसभा कामकाज सल्लागार समितीच्या गुरुवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीत विधानसभेचे २०२१ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनाचे कामकाज सोमवार, दिनांक १ मार्च, २०२१ ते बुधवार, दिनांक १० मार्च, २०२१ रोजीपर्यंत निश्चित करण्यात आले असून या कालावधीत प्रश्नोत्तरे घेण्यात येतील व उर्वरित प्रश्न व्यपगत करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

त्यानुषंगाने दिनांक २ ते १० मार्च, २०२१ या कालावधीतील वस्तुस्थितीकरिता विभागाकडे पाठविण्यात आलेले प्रश्न तसेच दिनांक १२ ते १९ मार्च, २०२१ या कालावधीसाठी विभागाकडे पाठविण्यात आलेले तारांकित स्वीकृत प्रश्न व वस्तुस्थितीचे प्रश्न व्यपगत करण्यात आले आहेत.

(राजेश तारवी)
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति :**

१) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
२) मा.उप मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी तथा कार्यवाही अग्रेषित.